# प्रेसनोट

जा.क्र. ६५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०७/१०/२०१६

## मोटार सायकल अडवुन जबरीने नगदी रुपये व साहीत्य चोरुन नेणा—या आरोपीस मुख्य न्यादंडाधिकारी यांचे कडुन ०३ वर्ष, कारागृहाची शिक्षा

दिनांक ०२/६/२०१४ रोजी १४.४५ वाजता आरोपीतांने पोलीस स्टेशन भंडारा हद्दीतील ग्राम खुर्शीपार शिवारात फिर्यादी मोटार सायकल थांबवुन त्याचे खिशातील नगदी १०००/—रु. बॅकेची पासबुक व गाडीची चाबी हिसकावुन नेल्याने पोस्टे. भंडारा येथे कलम ३९२,३४ भांदवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद वाकडे पोस्टे भंडारा यांनी पो.स्टे भंडारा यांचे मार्गदर्शनाखाली करुन गुन्हयातील आरोपी एकनाथ योगीराज देशभ्रतार वय १९ वर्ष, रा. रामगड झोपडपटटी गौतमबुध्दोच मुर्तीजवळ कामठी नागपुर व १ आरोपीस अटक करुन गुन्हयात जबरीने हिसकावुन नेलेला माल हस्तगत केले. आरोपीविरुध्द परिस्थीती जन्य पुरावा तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षदार गोळा करुन मुदतीचे आत सदर गुन्हा न्यायप्रविष्ट करण्यात आला.

सदर गुन्हया मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, भंडारा यांचे न्यायालयात बोर्डावर आलेनंतर कोर्ट पैरवी पोहवा. गजानन गिते बं. नं. ६५७ यांनी तसेच, पोहवा वहीले बं. नं. २००, नापोशि दहिवले बं. नं. ११०८ यांनी तसेच तपासी अधिकारी पोउपनि श्री. विनोद वाकडे यांनी तपास केला असुन मा. पोलीस अधिक्षक विनीता साहु मॅडम, मा. श्री. संजय जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, जयवंत चव्हान,ठाणेदार भंडारा यांनी गुन्हयाचे घटनाक्रमाबाबत न्यायालयात योग्यरित्या मांडणी केल्याने व आरोपी विरुध्द असलेले पुरावे सिध्द केल्याने मुख्य न्याय दंडाधिकारी मा. श्रृती शर्मा, मुख्य न्यायालय ,भंडारा यांनी आरोपी एकनाथ योगीराज देशभ्रतार वय १९ वर्ष, रा. रामगड झोपडपटटी, गौतम बुध्दाचे मुर्तीजवळ कामठी नागपुर यास ३ वर्ष, शिक्षा व २,०००/—रु. ,दंड न भरल्यास १ महिना सजा अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर न्यायनिर्णयामुळे विर्जनस्थळी अशा प्रकारे सामान्य व्यक्तींना मोटार सायकल अडवुन त्यांचे साहित्य लुटणारे गुन्हेगारावर वचक निर्माण होण्यास अत्यंत मोलाची मदत होईल सदर खटल्यामध्ये सरकारी वकील म्हणुन ॲड. श्री. तामगाडगे यांनी कामकाज पाहीले आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.